# शिव, शिवरात्री आणि जागरणाचे आध्यात्मिक रहस्य

आपल्या देशामध्ये शिवरात्रीचे हे महान पर्व दरवर्षी मोठया उत्साहाने साजरे केले जाते.याच दिवशी शिवभक्त शिव मंदिरामध्ये जाऊन शिवलिंगावर दूध, बेल पत्री, धोत-याची फूले इ.वाहतात.या दिवशी भक्त लोक पूजा करतात, उपवास करतात,त्याच बरोबर रात्रभर जागरण करतात.शिवरात्रीचे महत्व जाणून घेणे आवश्यक आहे कि शिव कोण आहे? व त्या दिवसाला रात्रच का म्हटले जाते? परमात्मा शिवावर बेलपत्री वाहणे, उपवास करणे तसेच रात्री जागरण करणे या सगळयाच गोष्टी काही विशेष कर्माला सिद्ध करतात.कारण भक्तिमार्गात जे कर्मकांड आपण करतो त्यामागे काही ना काही आध्यात्मिक रहस्य दडलेले आहे.तसेच या प्रत्येक कर्मकांडाचा आपल्या व्यक्तिगत जीवनावर तसेच समस्त मानव जातीवर काही ना काही परिणाम जरूर होत असतो.आज आपण प्रत्येक गोष्ट फक्त परंपरा म्हणूनच करीत आलो आहोत.म्हणूनच आवश्यकता आहे कि, या महान पर्वाचे महत्व व त्याचे आध्यात्मिक रहस्य समजून घेणे व ते आपल्या व्यवहारिक जीवनामध्ये धारण करण्याचा प्रयत्न करणे.

भारताच्या कानाकोप-यात 'शिवाची' लाखो मंदीरे आहेत ज्यामध्ये, शिवाची प्रतिमा'शिवलिंगा'च्या रूपामध्ये आपण बघतो.काश्मिरमध्ये अमरनाथ, गुजरातमध्ये सौराष्ट्रचा सोमनाथ, वाराणसीमध्ये विश्वनाथ, उज्जैनमध्ये महाकालेश्वर व नेपाळमध्ये पशुपतिनाथ च्या नावांनी शिवाची मंदिरे प्रसिद्ध आहेत.या मंदिरांची नावे शिवाच्या कर्तव्याला स्पष्ट करतात.यावरून सिद्ध होते कि, शिवच परमात्मा आहे.असे सांगितले जाते कि, दक्षिण भारतात तामिळनाडूमध्ये रामेश्वर याठिकाणी श्री कृष्णांने शिवाची पूजा केली आहे.यावरून स्पष्ट होतं कि, देवांचा देव महादेव एक शिवच आहे व ते श्रीकृष्ण, श्रीराम यांचेही परमपिता आहेत.परमात्मा हा निराकार आहे.त्याला देवी देवतांसारखे दैहिक स्वरूप नाही. म्हणूनच भारतातील १२ प्रसिद्ध शिवालयांना 'ज्योतिर्लिंग मंदिरे' असे म्हटले जाते.शिव ब्रह्मा, विष्णू व शंकर या तीनीही देवतांचे रचयिता असल्यामुळे शिवाला 'त्रिमूर्ती शिव' असे म्हटले जाते.

शिवलिंगावर त्रिपुंड ओढला जातो, तो शिव परमात्मा त्रिनेत्री, त्रिकालदर्शी व त्रिलोकीनाथ असल्याचे प्रतिक आहे.शिवाला 'शंभो' किंवा स्वयंभू व सदाशिव असेही म्हटले जाते. याचा अर्थ असा कि, 'शिव' च परमात्मा आहे, ज्याचा कुणीही रचयिता नाही. 'शिव' अर्थात 'कल्याणकारी'.परमपिता परमात्मा शिव पावन श्रेष्ठाचारी दुनियेची स्थापना, पालना तसेच पतित कलियुगी दुनियेतील सर्व वाईट प्रवृत्तींचा विनाश अशा आपल्या तीन दिव्य कर्तव्यांद्वारे सर्व मानवांचे कल्याण करतात अर्थात सर्वांना मुक्ति जीवनमुक्ति बहाल करतात यावरून सिद्ध होते कि, शिवच परमात्मा आहेत.

**शिवरात्रीचे रहस्य ः** खरोखर विचार करण्यासारखी गोष्ट आहे कि,आपण सर्व देवतांचा, महात्म्यांचा जन्मदिवस, पुण्यतिथी साजरी करतो परंतु शिवाची रात्रच का साजरी केली जाते? उदाहरणार्थ श्रीकृष्णाच्या जन्म मध्यरात्री झाला असताना सुद्धा त्या दिवसाला जन्मदिवस असे म्हटले जाते.मग शिवाचीच रात्र का साजरी केली जाते? यामागचे कारण तरी काय? वास्तविक महाशिवरात्री हे पर्व परमपिता शिव परमात्मा धरतीवर अवतरित होण्याची आठवण करून देते.इथे रात्री हा शब्द अज्ञानामुळे होणा-या नैतिक अधोगतीचे प्रतिक आहे.परमात्मा शिव हाच ज्ञानाचा सागर आहे.जो सत्य ज्ञानाच्या आधारे अज्ञान अंधकारातून, प्रकाशाकडे अथवा असत्याकडून सत्याकडे समस्त मानवाला घेऊन जातो.भगवंताने गीतेमध्ये सांगितले आहे कि, जेव्हा जेव्हा धर्म ग्लानी होते तेव्हा मी स्वतः धरतीवर अवतरित होऊन अधर्माचा विनाश व एका सतधर्माची पुनर्स्थापना करून पतित आसुरी सृष्टीचे पुन्हा दैवी सृष्टीमध्ये परिवर्तन करतो.

आता असा प्रश्न निर्माण होतो कि, परमात्मा शिव सृष्टी चक्रामध्ये, आपली दिव्य, अलौकिक कर्तव्य ... अंती व

pdfMachine
A pdf writer that produces quality PDF files with ease!
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, if you can print from a windows application you can use pdfMachine.
Get yours now!

सतयुगाच्या सुरवातीस म्हणजेच या दोन युगांच्या संगमावर स्थापना, पालना व विनाश ही तीनीही कर्तव्य पार पाडतात, कारण संपूर्ण कालचक्रामध्ये हीच वेळ विश्व नवनिर्माणाची सिद्ध होते. याच वर्तमान काळात परमात्मा शिव प्रजापिता ब्रह्माच्या शरीरामध्ये परकाया प्रवेश करून अर्थात अवतरित होऊन सतयुगी दैवी सृष्टीच्या स्थापनेसाठी ईश्वरीय सत्य ज्ञान ऐकवितात. परमात्मा शिवाचा साधारण मनुष्याप्रमाणे मातेच्या गर्भातून जन्म होत नाही तर त्यांनी सांगितलेल्या वचनानुसार प्रकृतिला अधीन करून, ब्रह्माच्या तनाचा आधार घेतात अर्थात परकाया प्रवेश करून दिव्य जन्म घेतात. परमात्म्याच्या अवतरणाविषयी गीतेमध्ये स्पष्ट सांगितलेले आहे कि, परमात्मा जन्म-मरण, पाप-पुण्य इत्यादी पासून अलिप्त आहे. भक्त लोक ज्या भावनेने त्यांची पूजा करतात त्याच स्वरूपात त्यांची इच्छा ते पूर्ण करतात.

आज जेव्हा सृष्टीवर पुन्हा भ्रष्टाचार, अत्याचार सर्वत्र फोफावला आहे, सर्वत्र नैतिकतेचे पतन मर्यादे पलिकडे होत आहे, या वेळी परमात्मा शिव पुन्हा सर्व मनुष्य आत्म्यांना अज्ञान अंधकारातून जागृत करण्यासाठी प्रजापिता ब्रह्मा वत्सांमार्फत सत्य ज्ञान देऊन तसेच सहज राजयोग शिकवून **'योगी बना, पवित्र बना'** हा ईश्वरीय संदेश देत आहेत. हा संदेश परमात्म्याच्या अवतरणाच्या सत्यतेला सुचवितो. प्रत्येक धर्म व आध्यात्म प्रेमी व्यक्तिने ज्ञानाच्या तिस-या नेत्राद्वारे वर्तमान काळातील भयानकता तसेच शास्त्रात वर्णिलेल्या कलियुगाच्या अंताची व सतयुगाच्या आदिची चिन्हे समजून घेतली पाहिजेत. आजकालच्या दैनंदिन जीवनातील घडणा-या अनेक घटनांमुळे मानवता व दानवता यामधील अंतरच संपलेले आहे. मनुष्य अज्ञानाच्या आहारी जाऊन आपल्या बुद्धीचा वापर विंध्वंसक गोष्टींसाठी करीत आहे.

शिवरात्रीदिवशी केला जाणारा खरा उपवास हाच आहे कि, आपण परमात्मा शिवाशी मनबुद्धीने त्याच्याजवळ रहायला हवे. जागरणाचा अर्थ असा आहे कि, काम-क्रोधादि विकाराच्या आहारी जाऊन होणा-या नुकसानापासून स्वतःचा बचाव करणे. कारण इथे स्थूल रूपाने न झोपणे म्हणजे जागरण नाही,एखादया झोपलेल्या व्यक्तिला कोणीही उठवू शकतं पण अज्ञान निद्रेमध्ये झोपलेल्या व्यक्तिला फक्त परमात्माच जागा करू शकतो. म्हणूनच शिवरात्रीला जागरणाचे महत्व आहे.

तर आपण सर्वजण या आध्यात्मिक रहस्याला जाणून घेऊन शिवरात्री अर्थपूर्ण रित्या साजरी करूया.

प्रति,
सादर प्रकाशनार्थ ,
दै.
कार्यालय, इचलकरंजी.

**pdfMachine**
**A pdf writer that produces quality PDF files with ease!**
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, if you can print from a windows application you can use pdfMachine.
Get yours now!